



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ३१९ वा ● मंगळवार ०९ एप्रिल २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 319 | Date : 09/04/2024 blow Tuesday Page 4 Price 4


चंद्रपुरात पंतप्रधानांची पहिली प्रचार सभा

# काँग्रेसबरोबर नकली शिवसेना!

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची टीका

काश्मीर पेटत असताना बाळासाहेब ठाकरे काँग्रेसच्या विरोधात उभे ठाकले होते. बाळासाहेबांचे तेच विचार आता एकनाथ शिंदे पुढे नेत आहेत. : **नरेंद्र मोदी, पंतप्रधान**




चंद्रपूर : राज्यात काँग्रेसबरोबर असलेली शिवसेना नकली आहे व बाळासाहेब ठाकरे यांचे विचार मुख्यमंत्री एकनाथ शिंदेच पुढे नेत आहेत, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता त्यांच्या पक्षावर जोरदार टीका केली. लोकसभा निवडणूक जाहीर झाल्यानंतर पंतप्रधानांची पहिलीच सभा । **पान २ वर**

# धमक्यांना घाबरू नका, 'त्यांना' दुरुस्त करण्याची वेळ;

## शरद पवार यांचे अजित पवारांना थेट आव्हान



बारामती : लोकसभा निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून धमक्या दिल्या जात असल्याची चर्चा सुरू असतानाच 'अशा धमक्यांना घाबरू नका, त्यांना दुरुस्त करण्याची वेळ आता आली आहे', अशा शब्दांत शरद पवार यांनी सोमवारी कार्यकर्त्यांना धीर दिला. कितीही धमक्या द्या, तुमच्या धमक्यांना भीक न घालणारी ही अवलाद आहे, असे थेट आव्हानच शरद पवार यांनी दिले.शरद पवार यांनी आज बारामतीच्या जिरायत भागाचा दौरा केला. सुपे येथील सभेत 'घड्याळाला मतदान केले नाही तर पाणी मिळणार नाही, कारखान्याला ऊस जाणार नाही', असा मजकूर असलेली

# यंदा मुबलक साखर; राज्यात १०८ लाख टन साखरेचे उत्पादन



पुणे : राज्यातील गळीत हंगाम अंतिम टप्प्यात आहे. यंदाच्या गाळप हंगामात २०७ कारखाने सुरू झाले होते, त्यांपैकी १७८ कारखान्यांनी गाळप पूर्ण करून धुराडी बंद केली आहेत. सोमवारी, आठ एप्रिलअखेर राज्यात १०८ लाख टन साखरेचे उत्पादन झाले आहे, जे अंदाजापेक्षा १८ लाख टनांनी जास्त आहे.

यंदाच्या गळीत हंगामात राज्यात १०३ सहकारी आणि १०४ खासगी, अशा एकूण २०७ साखर कारखान्यांनी आपला हंगाम सुरू केला होता. आठ एप्रिलअखेर राज्यातील १७८ कारखान्यांनी आपले गाळप पूर्ण करून कारखाने बंद केले आहेत. हंगामात दैनंदिन सरासरी नऊ लाख टनांनी गाळप करून आजअखेर १०५९ लाख टन उसाचे गाळप पूर्ण करून १०८ लाख टन साखरेचे उत्पादन घेतले आहे. मागील वर्षी सरासरी साखर उतारा १० टक्के होता. यंदा त्यात वाढ होऊन १०.२४ टक्क्यांवर गेला आहे. कोल्हापूर विभागातील ४० पैकी ३९, पुणे विभागातील ३१ पैकी २६, सोलापूर विभागातील ५० पैकी ४५, नगरमधील २७ पैकी १८, छत्रपती संभाजीनगरमधील २२ पैकी १९, नांदेड विभागातील २९ पैकी २५, अमरावती विभागातील ४ पैकी ४, नागपूर विभागातील ४ पैकी २ कारखान्यांनी गाळप पूर्ण केले आहे. अद्याप २९ कारखान्यांचे गाळप सुरू आहे. पण वाढत्या उन्हाच्या झळांमुळे ऊसतोडणी मजूर काम सोडून जात आहेत. मजुरांना जास्त पैसे देऊन थांबवून ठेवावे लागत आहे. जे मजूर ऊसतोडणी करीत आहेत. त्यांनाही उन्हांच्या झळांमध्ये ऊसतोडणी करणे अडचणीचे ठरत आहे. त्यामुळे कारखाने यंत्रांद्वारे ऊसतोडणीला प्राधान्य देत आहेत. हंगामाच्या सुरुवातीस राज्यात ९० लाख टन साखरेचे उत्पादन होण्याचा अंदाज होता. प्रत्यक्षात १०८ लाख टन साखरेचे उत्पादन झाले आहे. पश्चिम महाराष्ट्रातील कारखाने अद्याप सुरू आहेत. पंधरा एप्रिलपर्यंत हंगाम संपेल, त्यानंतर तीन-चार कारखाने महिनाअखेरपर्यंत चालतील. राज्यात हंगामअखेर ११० लाख टन साखरेचे उत्पादन होण्याची शक्यता आहे, अशी माहिती वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनचे (विस्मा) अध्यक्ष बी. बी. ठोंबरे यांनी दिली.

# आंतरराज्य मालवाहतूक व प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांची दोन्ही राज्यात कसून तपासणी करावी : उत्पादन शुल्क विभागीय उपायुक्त सागर धोमकर



- ✻ दोन्ही राज्याच्या सीमावर्ती भागात संयुक्त मोहीम राबवून अवैध दारू विरोधी कठोर कारवाई करावी
- ✻ सोलापूर येथे राज्य उत्पादन शुल्क व कर्नाटक राज्य उत्पादन शुल्क विभागाची आंतरराज्य समन्वय बैठक

सोलापूर/प्रतिनिधीः भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहीर केलेला असून या अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघासाठी दिनांक ७ मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. तरी या कालावधीत सोलापूर जिल्ह्यात कर्नाटक राज्यातून कोणत्याही प्रकारे अवैध दारू येणार नाही व येथून कर्नाटक राज्यात जाणार नाही यासाठी दोन्ही राज्यातील उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्यांनी परस्परांत समन्वय ठेवून आंतरराज्य मालवाहतूक व प्रवासी वाहतूक करणाऱ्या सर्व वाहनांची दोन्ही बाजूकडील चेक पोस्टवर कसून चौकशी करावी, असे निर्देश राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पुणे विभागीय कार्यालयाचे उपायुक्त सागर धनगर यांनी दिले.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने महाराष्ट्र व कर्नाटक राज्याच्या उत्पादन शुल्क विभागाची आंतरराज्य समन्वय बैठक सोलापूर नियोजन भवन येथील सभागृहात झाली यावेळी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे विभागीय उपायुक्त श्री. धोमकर मार्गदर्शन करत होते. यावेळी विजयपुरा जिल्ह्याचे उपायुक्त शिवलिंगप्पा बनाटी, अधीक्षक जगदीश इनामदार, गुलबर्गा जिल्ह्याच्या उपायुक्त आफरीन सय्यद, अधीक्षक। **पान २ वर**

## गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला सोन्याचा भाव ७३४००

मुंबईः साडेतीन शुभ मुहूर्तांपैकी एक असणाऱ्या गुढीपाडव्याच्या सणाला अवघे काही तास शिल्लक राहिले आहेत. मराठी संस्कृतीत गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर सोने खरेदी करण्याची परंपरा आहे. मात्र, यंदा सोन्याचा दर अक्षरशः गगनाला भिडला आहे. गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला सोन्याच्या किंमतीने नवा उच्चांक गाठला आहे. सोमवारी संध्याकाळी बाजार बंद होताना सोन्याचा दर प्रतितोळा ७३४०० रुपये इतका नोंदवण्यात आला. त्यामुळे उद्या गुढीपाडवा असल्याने बाजार उघडताच सोन्याचा दर ७५ हजारांचा टप्पा ओलांडणार का,याची उत्सुकता सर्वांना लागली आहे. गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर सोने खरेदीसाठी झुंबड उडत असल्याने यादिवशी साहजिकच सोन्याला जास्त मागणी असते. त्यामुळे गुढीपाडव्याला सोन्याच्या किंमतीमध्ये। **पान २ वर**



## राज्यात महायुती आणि महाविकास आघाडीला पाडणार', जरांगे पाटलांचा नाशकातून निर्धार!

मुंबई : लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर मराठा आरक्षणासंदर्भात मनोज जरांगे पाटील हे महाराष्ट्रभर दौरा करत आहे. आज नाशिक जिल्ह्यात मनोज जरांगे पाटील आले असता त्यांनी महायुती आणि महाविकास आघाडीवर जोरदार टीका केली. राज्यात महायुती आणि महाविकास आघाडीला आम्ही पाडणार आहे. यांनी आम्हाला फसवलंय, असा निर्धारच मनोज जरांगे पाटलांनी केला आहे. मनोज जरांगे पाटील म्हणाले की, सगळे जण सारखेच आहेत. तिघांनी बनून षड्यंत्र केलंय. किती दिवस मराठ्यांची फसवणूक करणार आहात. मागच्या काळात आमचा महाविकास आघाडीने कार्यक्रम केला आणि आताही महायुतीच्या सरकारने तेच केले आहे. या दोघांना निवडणुकीत पाडा, असे मनोज जरांगे पाटलांनी म्हंटले आहे.



...तर विधान सभेला उमेदवार देणार

ते पुढे म्हणाले की, मराठ्यांनो निवडणुकीला उभ राहण्यापेक्षा यांना पाडा. यांना पाडण्यात सुद्धा विजय आहे, मला समाजाव्यतिरिक्त बाकी काहीही कळत नाही. ६ जूनपर्यंत मराठ्यांना आरक्षण दिलं नाही तर विधानसभेला उमेदवार देणार, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला दिला आहे. । **पान २ वर**

## पटोलेंचा प्रस्ताव म्हणजे वरातीमागून घोडे : आंबेडकर

अकोला : लोकसभा निवडणुकीच्या जागावाटपाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली असताना काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी 'वंचित'ला सोबत घेण्याचे वक्तव्य केले आहे. याबाबत बोलताना या प्रस्तावाला वरातीमागून घोडे असेच म्हणावे लागेल, अशी टीका वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी रविवारी येथे केली. राज्यातील उर्वरित जागांचा निर्णय दोन दिवसात जाहीर करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. राज्यात काँग्रेसला नेताच नसल्याची टीका करताना काँग्रेसला निर्णय घेता आला नसल्याचा आरोपही आंबेडकरांनी केला.





दैनिक
# यश सिद्धि न्यूज




## संपादकीय

### राग नकोच...

आयपीएल क्रिकेट स्पर्धेची क्रेझ मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. दरम्यान, यंदाच्या या स्पर्धेत मुंबई इंडियन्स संघाच्या नेतृत्वात बदल केला गेला. रोहित शर्माच्या जागी हार्दिक पांड्या याच्याकडे ही जबाबदारी देण्यात आली आणि तिथेच मिठाचा खडा पडला. मुंबईचे चाहते इतके संतापले की पांड्याबद्दल अपशब्दही वापरायला त्यांनी कमी केले नाही. इतका टोकाचा राग कशासाठी, असा प्रश्न पडतो. आयपीएल स्पर्धा एक व्यावसायिक स्पर्धा असून तेथे केवळ नफा हे एकच तत्त्व मानले जाते. मग अशा वेळी पुढील काही वर्षांचा विचार करत संघाच्या हितासाठी काही निर्णय घेतले गेले तर बिघडले कुठे? परंतु, आपल्या देशात व्यक्तिपूजा इतकी महत्त्वाची मानली जाते की आपल्या आवडत्या व्यक्तीने काहीही केले किंवा त्याच्याबाबत काहीही घडले तरी तो आपल्या घरातील प्रश्न असल्यासारखे आपण वागतो. मुळात या बदलाबाबत रोहितने एकही शब्द तोंडातून काढलेला नाही. मात्र, त्याचे चाहते पांड्याला 'छपरी' म्हणण्यापर्यंत वाहवत गेले ही शोकांतिका आहे. पांड्या एक अष्टपैलू क्रिकेटपटू तर आहेच परंतु एक जिद्दी खेळाडू आहे. तरीही तो आपल्या संघाचा कर्णधार का केला गेला व त्यासाठी तब्बल पाच वेळा विजेतेपद मिळवून देणाऱ्या रोहितचा बळी का घेतला, हा प्रश्न चाहते विचारत आहेत. गुजरात टायटन्स संघ दोन वर्षांपूर्वी जेव्हा आयपीएलमध्ये दाखल झाला तेव्हा पांड्याच्याच नेतृत्वाखाली संघाने पहिल्याच स्पर्धेत विजेतेपद पटकाविले होते. या स्पर्धेतील सगळे आपलेच खेळाडू आहेत. ते आज वेगवेगळ्या संघातून खेळत असले तरीही येत्या काळात आयपीएल स्पर्धा संपल्यावर ते देशाकडून एकाच संघात खेळणार आहेत. त्यांच्याबाबतचा बेबनाव प्रत्यक्षात उतरला तर भारतीय संघाची काय स्थिती होईल याची थोडीतरी शंका येते का, असा प्रश्न आता चाहत्यांना विचारावासा वाटतो. खूप वर्षांपूर्वी युवराज सिंग पंजाबकडून खेळत असताना मुंबईच्या प्रेक्षकांनी त्याच्यावर टीका केली होती. त्यावेळी बक्षीस समारंभाच्या वेळी त्याने मुंबईच्या चाहत्यांना विचारले होते की, आम्ही तुमचे नाही का? केवळ एका स्पर्धेत अन्य संघाकडून खेळत असल्यामुळे आम्ही अपराधी ठरत नाही, आम्हीही तुमचेच आहोत. त्यावेळी वानखेडेवर उपस्थित असलेल्या प्रत्येकाने उभे राहून युवराजला मानवंदना दिली होती व आपलेपणा दाखवत माफीही मागितली होती. मग पांड्याच्याच बाबतीत हे चित्र कशासाठी? नुकतीच होळी पौर्णिमा संपली. मात्र, आयपीएलच्या मातीत पेटलेल्या या होळीचा शिमगा आणखी किती दिवस जळत राहणार आहे.

# निवडणूक आणि प्रचार राजकीय पक्षांनी घ्यावयाची खबरदारी




या देशातील प्रत्येक नागरिक हा भारतीय असून भारतीय म्हणून त्याला प्रत्येक निवडणुकीत उभे राहण्याचा अधिकार आहे. यासाठी वयाची २१ वर्ष पूर्ण होणे ही एक अट महत्त्वाची आहे. ज्याला निवडणुकीत उभे राहायचे आहे, असा व्यक्ती स्त्री-पुरुष कोणीही कुठल्यातरी राजकीय पक्षाचा सदस्य असायला हवा अथवा अपक्ष म्हणूनही निवडणूक लढवू शकतो.

जीवन जगत असताना ज्याप्रमाणे आपल्या आयुष्याला आपण काही नियम घालून दिलेले असतात. त्यामुळे आपले स्वतःचे आयुष्य हे सुखकर होत असते. त्याप्रमाणेच निवडणूक लढवितांनाही भारतीय निवडणूक आयोगाने काही बंधने नियम घालून दिलेले आहेत त्याचे पालन आपल्या वैयक्तिक आयुष्यात आणि निवडणूक लढवितांना दोन्ही वेळेस केल्यास फायदाच होतो .

सध्या सार्वत्रक लोकसभा निवडणुकीचे वातावरण असल्याने राजकीय पक्षांनी घ्यावयाची काळजी हे महत्त्वाचे आहे. कारण, यावेळी ऐकणारा वर्ग /प्रेक्षक/ नागरिक हा मोठा असतो. त्यामुळे त्याचे पडसाद समाजात सकारात्मक तसेच नकारात्मक ही होऊ शकतात. म्हणून निवडणूक प्रचार प्रसाराच्या वेळेस राजकीय पक्ष आणि उमेदवारांनी विशेष काळजी घेणे अपेक्षित आहे. कारण, हेच निवडून आलेले लोकप्रतिनिधी भारतीय संसदेत बसून कायद्याचे राज्य चालवितात त्यावेळी त्यांना सर्वसमावेशक विचार करावा लागतो. तीच भावना त्यांनी निवडणुकीच्या काळात पक्षाचे ध्येय धोरणे मांडताना तसेच मतदारसंघातील मुद्दे मांडताना विचारपूर्वक ठेवावी.

निवडणुकीचा प्रचार-प्रसार करताना जातीपाती वरून कुठलेही आक्षेपार्य भाषण देता येत नाही. तसेच जातीचा उल्लेख करणे राजकीय पक्षांनी टाळायला हवे. कुठली एक जात श्रेष्ठ आणि कुठली एक जात निम्न असे न बोलता पक्षाचे ध्येय धोरणे अथवा भविष्यात जनतेला आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधा बद्दल बोलणे जास्त सुसंगत असते.

ज्याप्रमाणे जातीपातीवर बोलणे टाळले पाहिजे त्याप्रमाणेच धर्म द्वेष न करता एखाद्या धर्माला विशेष महत्त्व न देता आपल्या संविधानामध्ये जो सर्वधर्म समभावाचा संदेश आहे तो जोपासणे आणि त्या परीने आपल्या राजकीय पक्षांचा अथवा उमेदवारांनी स्वतःचा प्रचार प्रसार करणे अपेक्षित आहे.भारतीय घटनेच्या उद्देशिकेत सामाजिक सलोखा पाळणे असे उल्लेखित असून सामाजिक सलोखा असल्यास समाजाची प्रगतीच होते अधोगती होत नाही याचे भान निवडणुकीच्या काळात राजकीय पक्षांनी ठेवल्यास निवडणूक चा हा काळ सर्वांसाठी सूसह्य आणि प्रबोधनाचा ठरेल.

निवडणुकीत उभे राहणारे उमेदवार हे प्रभावी व्यक्तिमत्व असतात. त्यामुळे त्यांचे असंख्य फॉलोवर्स अनुयायी असतात. जे त्यांच्या व्यक्तिमत्त्वामधून बऱ्याच गोष्टी शिकून स्वतःच्या आयुष्यात त्याप्रमाणे वागतात. निवडणुकीत उभे असणाऱ्या उमेदवाराने कायदा व सुव्यवस्था पालन करून त्याप्रमाणे प्रचार प्रसार केला तर आपसूकच त्यांचे फॉलोवर्स अनुयायी देखील त्याचप्रमाणे कायदा व सुव्यवस्था पालन करतील. त्यामुळे या निवडणुकीच्या धामधुमीच्या काळात कायदा व सुव्यवस्थेचे पालन करणे हे प्रत्येक उमेदवाराचे कर्तव्य आहे.

आताचा काळ हा सामाजिक माध्यमाचा काळ आहे. माध्यमांवर लाखो फॉलोवर्स असतात जे आपल्या नेत्याला उमेदवाराला फॉलो करतात या समाज माध्यमांवर एक संदेश खूप मोठी हानी करू शकतो त्याप्रमाणे प्रबोधनही करू शकतो. त्यामुळे सामाजिक माध्यमाचा वापर करताना तो काळजीपूर्वक विशेषतः निवडणुकीच्या काळात अधिक जागरूकपणे करणे आवश्यक आहे. जेणेकरून त्याचे कुठलेही वाईट पडसाद उमटणार नाहीत.निवडणुकीचा काळाचे वातावरण भारावलेले असते त्यामुळे शब्दच्छलाने शब्द भेद तयार होऊन एखादा वाद विकोपाला जाण्याचे नाकारता येत नाही अशावेळी कार्यकर्ता प्रवक्त्यांमध्ये स्पष्टता हवी.

अंततः सर्वात महत्त्वाचे म्हणजे निवडणूक ही कोणासाठी आहे निवडणुकीच्या मागचा उद्देश काय आहे मतदान कशासाठी करायला हवे मतदार कोण आहे कारण संपूर्ण निवडणूक ही भारताचे नागरिक म्हणजेच मतदार ज्यांचे वय १८ वर्षे पूर्ण झालेले आहेत असे नागरिक या सर्व प्रक्रियेचा महत्त्वाचा हिस्सा आहेत. त्यामुळे मतदान का करावे यासंदर्भात जागृतीची प्रयत्न राजकीय पक्षांकडून उमेदवारांकडून होणे गरजेचे आहे. मतदार जागृती उपक्रम अधिकाधिक केल्यास मतदानाचा टक्का वाढेल आणि एका चांगल्या लोकशाहीला ते पोषक असे ठरेल त्यामुळे या सर्व निवडणूक प्रक्रियेत राजकीय पक्षाची भूमिका ही महत्त्वाची असून मतदार जागृती त्यांच्यावतीने अधिकाधिक व्हावी असे अपेक्षित आहे.

**अंजु कांबळे निमसरकर,**
**माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय बीड**

# डुबेरे जनता विद्यालयात विविध उपक्रमांतर्गत मतदार जनजागृती






सिन्नर : डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मतदार जनजागृती प्रभातफेरी काढण्यात आली. येत्या लोकसभा निवडणुकीत मतदानाची जास्तीत जास्त टक्केवारी वाढणे यासाठी निवडणूक आयोगाकडे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे .त्याचाच एक भाग म्हणून संपूर्ण गावातून घोषणा देत विद्यार्थ्यांनी मतदार जनजागृती फेरी काढली. विद्यार्थ्यांच्या हातात मतदान विषयक घोषणा देणारे फलक दिसून आले.मतदार राजा जागा हो- लोकशाहीचा धागा हो,मतदानासाठी वेळ काढा-आपली जबाबदारी पार पाडा, चला मतदान करू या- लोकशाही रुजवू या घोषनांनी गाव व परिसर दुमदुमाला. ठिकठिकाणी गावातील ज्येष्ठ नागरिक ,तरुण, महिला व नवमतदार यांना जनजागृती फेरीमध्ये सहभागी करून घेण्यात आले.

तसेच गावातील मतदारांसह विद्यार्थी, शिक्षक यांना उपशिक्षक सोमनाथ गिरी यांनी मतदार प्रतिज्ञा दिली.यावेळी मारुती मंदिराच्या आवारात मानवी साखळीचे आयोजन करून मतदार जनजागृती हे नाव तयार केले.

येत्या लोकसभा निवडणुकीत जास्तीत जास्त नागरिकांनी मतदान प्रक्रियेत सहभाग घेऊन मतदानाची टक्केवारी वाढवावी असे आव्हान यावेळी विद्यालयाचे पर्यवेक्षक रामदास वाजे यांनी केले. यापूर्वी विद्यालयाच्या वतीने सायकल रॅली, मोटर सायकल रॅली, मॅरेथॉन ,पालक मतदार मेळावा ,पथनाट्य रांगोळी,मेहंदी स्पर्धा, पोस्टर्स स्पर्धा मतदारांस पत्रलेखन स्पर्धा,मतदार घोष वाक्य आदिं सह विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यालयाचे प्राचार्य दिंगबर पठारे,पर्यवेक्षक रामदास वाजे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान जनजागृती फेरीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयाचे प्राचार्य दिगंबर पठारे पर्यवेक्षक रामदास वाजे,पी.आर.करपे, केंद्रस्तरीय मतदान नोंदणी अधिकारी सोमनाथ गिरी डोंगरसिंग रबडे, शिवाजी गुरुळे,डी. एच.जाधव ,भारती निखाडे ,कचेश्र्वर शिंदे,पोलीस पाटील प्राध्यापक रामदास वारुंगसे, शिवनाथ हुजरे, सुनील ससाने ,सीमा गोसावी,राजेंद्र गांगुर्डे,सुषमा थोरात,अलका काळोगे,रेखा खंडीझोड, कल्पना शिंदे,प्राध्यापक संदीप पानसरे,प्राध्यापक सुदाम वारुंगसे,सिद्धी आहेर,निवृत्ती बर्गे,रवि गोजरे आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

पान १ वरुन

## काँग्रेसबरोबर नकली शिवसेना!

सोमवारी चंद्रपुरात झाली. यावेळी मोदींनी काँग्रेसच्या जाहीरनाम्यावरही पुन्हा एकदा जोरदार हल्लाबोल केला.

चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार, वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रचारार्थ मोरवा येथे पंतप्रधानांची सोमवारी सभा झाली. यावेळी व्यासपीठावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, गडचिरोलीचे उमेदवार अशोक नेते, मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, केंद्रीय मंत्री रामदास आठवले व अन्य नेते उपस्थित होते. अस्थिर सरकारमुळे महाराष्ट्राचे सर्वाधिक नुकसान झाले. अस्थिरता विरुद्ध स्थैर्याची ही लढाई आहे, असे मोदी यावेळी म्हणाले. स्थिर सरकारचे महत्त्व महाराष्ट्रातील जनतेपेक्षा कुणालाच अधिक माहीत नाही. महाराष्ट्रात महाविकास आघाडीची सत्ता होती तेव्हा त्यांनी अनेक योजना बंद केल्या, असा आरोप मोदी यांनी केला.

स्वातंत्र्यापूर्वी देशाची धर्माच्या नावावर फाळणी झाली होती, देश स्वतंत्र होताच काश्मीरची समस्या निर्माण करण्यास, देशातील दहशतवाद, नक्षलवाद, बॉम्बस्फोट आणि दहशतवाद्यांना संरक्षण देण्यास काँग्रेस जबाबदार होती. काँग्रेसने राम मंदिर उभारणीत अडचणी निर्माण केल्या. अगदी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतरत्न मिळू दिला नाही. कारले साखरेत विरघळले किंवा तुपात टाकले तरी ते कडूच राहते, ही म्हण काँग्रेसला शोभते, असे मोदी म्हणाले. आपल्या भाषणाची सुरुवात 'चंद्रपूरकरांना माझा नमस्कार' अशी मराठीतून करत गुढीपाडवा व नवीन वर्षांच्या नागरिकांना शुभेच्छाही दिल्या. काँग्रेसच्या जाहीरनाम्यात फाळणीनंतरच्या मुस्लिम लीगची भाषा आहे, या आरोपाचा पुनरुच्चारही पंतप्रधानांनी चंद्रपूरच्या सभेत केला. चंद्रपुरातून पंतप्रधान मोदी यांनी प्रचाराचा नारळ फोडला ही विजयाची नांदी आहे, असे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले. फडणवीस म्हणाले, की मुनगंटीवारांनी आमदार व मंत्री चंद्रपूरचा कायापालट केला असून आता, दिल्लीत आवाज बुलंद करण्याची वेळी आली आहे.पंतप्रधानांच्या या पहिल्याच सभेला महायुतीतील घटक या नात्याने रिपाइं (आठवले)चे अध्यक्ष व केंद्रीय समाजकल्याण राज्यमंत्री रामदास आठवले उपस्थित होते. मात्र मोदींनी त्यांच्याकडे सपशेल दुर्लक्ष केल्याचे दिसले. आठवले यांनी वेळोवेळी पंतप्रधानांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांची दखल मोदींनी घेतली नसल्याची चर्चा सभास्थळी होती.

## आंतरराज्य मालवाहतूक व प्रवासी ..

एन.सी. पाटील, उपअधीक्षक होनप्पा ओलेकर, सलगरे, निरीक्षक भिमन्ना राठोड, बी दौलतराय, बसवराज कित्तूर तसेच सांगली जिल्ह्याचे अधीक्षक प्रदीप पोटे, सोलापूर जिल्ह्याचे उपअधीक्षक संजय पाटील, निरीक्षक नंदकुमार जाधव, जगन्नाथ पाटील, सचिन भवड, दुय्यम निरीक्षक सौरभ भोसले, समाधान शेळके, सुखदेव सिद, सुरेश झगडे, शिवकुमार कांबळे, मानसी वाघ, सचिन गुठे तर धाराशिव जिल्ह्याचे निरीक्षक पवन मुळे व राहुल बांगर हे अधिकारी उपस्थित होते.

विभागीय उपायुक्त श्री. धोमकर पुढे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर दोन्हीही राज्यात आदर्श आचारसंहितेचे तंतोतंत पालन झाले पाहिजे. या निवडणुका निर्भय व खोल्या वातावरणात होण्यासाठी महाराष्ट्र व कर्नाटक राज्य उत्पादन शुल्क विभागाने परस्परात समन्वय ठेवून अवैध दारू विक्री करणाऱ्या विरुद्ध संयुक्तपणे मोहीम उघडली पाहिजे. यासाठी दोन्ही राज्यात सीमावर्ती भागातील चेक पोस्ट द्वारे अंतरराज्य मालवाहतूक व प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांची अत्यंत सूक्ष्मपणे तपासणी करावी. तसेच अन्य वाहनांचीही कसून चौकशी करून एक ही वाहनातून अवैध दारू वाहतूक होणार नाही याची खबरदारी घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

महाराष्ट्र व कर्नाटक उत्पादन शुल्क विभागाने अवैध दारू तस्करी करणाऱ्याच्या माहितीचे संकलन करून परस्परांना द्यावी. सीमावर्ती भागांमध्ये सामूहिक मोहिमा राबवणे, अवैध दारू साठवणूक ठिकाणे व हातभट्टी ठिकाणांची गोपनीय माहिती काढून त्यावर कारवाई करणे, सीमेवरील दारू दुकानांच्या दारु विक्री व्यवहारांवर कठोर नियंत्रण ठेवावे अशा सूचना श्री. धोमकार यांनी दिल्या.

यावेळी गुलबर्गा व विजयपुरा जिल्ह्यातील विभागीय उपायुक्तांनीही आचारसंहिता कालावधीत दोन्ही राज्यातील अधिकाऱ्यांनी परस्परांमध्ये समन्वय राखून व एकमेकांच्या संपर्कात राहून अवैध दारूची वाहतूक व विक्री होणार नाही याबाबत पुरेपूर दक्षता घेणे बाबत सर्व अधिका-यांना मार्गदर्शन केले. सोलापूर व माढा मतदारसंघासोबतच कर्नाटक राज्यातील गुलबर्गा व विजयपुरा लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूकीकरिता ७ मे रोजी मतदान होत असल्याने त्या अनुषंगाने मतदान कालावधी संपण्याच्या ४८ तास पूर्वीपासून दारु दुकाने बंद ठेवण्याबाबत सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी ड्राय डे आदेश निर्गमित केले आहे. त्याच अनुषंगाने कर्नाटक राज्यातही ड्राय डे आदेश काढावेत अशी मागणी सोलापूर उत्पादन शुल्क अधीक्षक नितीन धार्मिक यांनी केली. प्रारंभी बैठकीचे प्रास्ताविक श्री. धार्मिक यांनी करून लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहिता कालावधीत राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध दारूविरुद्ध केलेल्या कारवाईबाबत सादरीकरण केले.

## गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला

वाढ होते, हा नेहमीचा शिरस्ता आहे. परिणामी मंगळवारी वायदे बाजार उघडताच सोन्याचे भाव किती उसळी घेणार, याकडे सगळ्यांच्या नजरा लागल्या आहेत. आगामी काळ हा लग्नसराईचा असल्याने सोन्याचा दर आणखी वाढण्याची शक्यता आहे. तर चांदीच्या दरातही वाढ होण्याची शक्यता आहे. सोमवारी संध्याकाळी बाजार बंद होताना चांदीचा भाव प्रति किलो ८३ हजार ९०० रुपये इतका नोंदवण्यात आला. उद्या चांदीचा दरही वाढण्याची शक्यता आहे.

## राज्यात महायुती आणि महाविकास

निवडणुकीचे दोन महिने म्हणजे यांचा पोळा

लोकसभा निवडणुकीबाबत मनोज जरांगे म्हणाले की, हे दोन महिने म्हणजे यांचा पोळा आहे. यांच्यात विनाकारण जाऊ नका, फक्त मजा बघा.मराठा समाज वेळेला करेक्ट कार्यक्रम करणार आहे. टप्प्यात आल्यावर आम्ही कार्यक्रम करणार असा इशारा त्यांनी यावेळी दिला आहे.

निवडणुकीला उभे राहणं हा छगन भुजबळ यांचा धंदा आहे. स्वतः मोठे होऊन गोरगरिबांच्या पोटावर पाय देणे हा भुजबळांचा धंदा आहे. आमच्या नोंदी ओबीसीमध्ये सापडल्या आहेत. भुजबळ आणखी किती दिवस खोटं बोलणार आहेत. तुम्ही विरोध करत राहा, मी मराठ्यांना ओबीसीमधून आरक्षण घेऊनच दाखवणार, असा इशारा मनोज जरांगेनी भुजबळांना दिला आहे. तसेच नाशिक लोकसभा मतदारसंघासाठी छगन भुजबळ यांना उमेदवारी जाहीर होण्याची शक्यता आहे. यावरून ओपनच्या मतदारसंघात हे निवडणूक का लढवतात? असा सवाल मनोज जरांगेंनी भुजबळांना विचारला आहे.

## 'चुनाव का पर्व देश का गर्व' लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होण्याचे सचिन तेंडुलकर यांचे आवाहन

मुंबई : लोकशाहीच्या उत्सवात म्हणजेच निवडणुकीत मतदारांचा सहभाग वाढावा यासाठी प्रत्येक मतदान केंद्र मतदारांच्या स्वागताच्या प्रतीक्षेत आहे. प्रत्येक नागरिकाने लोकसभा निवडणुकीत मतदान करून आपली राष्ट्रीय जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन क्रिकेटपटू भारतरत्न सचिन तेंडुलकर यांनी केले आहे.लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत राज्यात ५ टप्प्यात मतदान होत आहे. मुंबई उपनगर जिल्ह्यात २० मे रोजी मतदान होणार असून, या चार मतदारसंघात ७३ लाख २८ हजार ८६५ मतदार आहेत. मतदारांनी आपले राष्ट्रीय कर्तव्य पूर्ण करावे यासाठी सचिन तेंडुलकर यानी ध्वनीचित्रफितीच्या माध्यमातून आवाहन केले आहे.'चुनाव का पर्व देश का गर्व' म्हणत सचिन तेंडुलकर याने सांगितले आहे की, प्रत्येक मतदान केंद्रावर मतदारांसाठी पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, प्रतीक्षा कक्ष, शौचालयांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. दिव्यांग आणि ८० वर्षांवरील मतदारांसाठी व्हील चेअर, मदतनीस आणि रॅम्पची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मतदारांना सुलभरित्या मतदान करता यावे यासाठी सर्वतोपरी सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. सर्व मतदारांनी आपली नावे मतदार यादीत नोंद असल्याची खात्री करावी.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

## देशात पहिल्यांदाच सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये मतदान केंद्रे

# मूळ संकल्पना पुण्याची; पुणे शहरातील ३५ गृहनिर्माण संस्थांमध्ये मतदान केंद्रे : जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे

पुणे : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदानाचा टक्का वाढावा यासाठी कमी मतदान असलेल्या शहरांमध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांत मतदान केंद्रे स्थापन करण्यात आली असून असा उपक्रम देशात प्रथमच राबविण्यात येत आहे. या उपक्रमाची मूळ संकल्पना पुणे जिल्ह्याची असून पुणे शहरातील ३५ गृहनिर्माण संस्थांमध्ये मतदान केंद्रे स्थापन करण्यात आल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी प्रसिद्धीमाध्यमांशी संवाद साधताना सांगितले.




जिल्ह्यातील ४ लोकसभा मतदार संघांच्या निवडणुकीचा निवडणूक कार्यक्रम सुरू आहे. त्यानुसार बारामती लोकसभा मतदार संघाची अधिसूचना १२ एप्रिल रोजी प्रसिद्ध होणार आहे तर नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची अंतिम मुदत १९ एप्रिल २०२४ अशी आहे. बारामती मतदार संघात नामनिर्देशन पत्र मागे घेण्याची अंतिम मुदत २२ एप्रिल आहे. पुणे, शिरुर आणि मावळ मतदार संघांची अधिसूचना प्रसिद्धी १८ एप्रिल रोजी, नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची अंतिम मुदत २५ एप्रिल तर उमेदवारी मागे घेण्याची अंतिम मुदत २९ एप्रिल २०२४ अशी आहे.

आजपर्यंत पुणे जिल्ह्यात ४३ लाख २८ हजार ९५४ पुरूष, ३९ लाख ६३ हजार २६९ स्त्री तर ७२८ तृतीयपंथी अशा एकूण ८२ लाख ९२ हजार ९५१ मतदारांची नोंद झाली आहे. नवीन मतदार नोंदणीसाठी अर्ज क्र. ६, आणि स्थलांतरणासाठी अर्ज क्र. ८ सादर करण्याची अद्यापही संधी असून बारामती मतदार संघात ९ एप्रिलपर्यंत तर अन्य तीन मतदार संघात १५ एप्रिलपर्यंत आलेल्या अर्जांवर निवडणूक प्रशासनाकडून कार्यवाही केली जाणार आहे. अंतिम मतदारसंख्या त्यावेळी निश्चित होईल. सर्व मतदान केंद्रांवर आवश्यक त्या मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. ५ किंवा ५ पेक्षा जास्त मतदान केंद्रे असलेल्या इमारतीमध्ये वाहनतळाची व्यवस्था, वैद्यकीय सुविधा, पाळणाघर, स्त्रीयांसाठी स्वतंत्र स्वच्छता गृह आदी ठळक सुविधांसह अन्य सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. मतदारांना मतदान केंद्राची माहिती देण्यासाठी शहरी भागात प्रत्येक वॉर्ड कार्यालयात मदत केंद्र स्थापन करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदार संघात बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट, व्हीव्हीपॅट वितरणाचे कामकाज कोरेगाव पार्क येथील भारतीय अन्नधान्य महामंडळाच्या गोदामातील मतदान यंत्र वितरण केंद्रातून राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत वितरण सुरू झाले आहे. मावळ लोकसभा मतदार संघाची मतमोजणी श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे आणि बारामती लोकसभा मतदार संघाची मतमोजणी कोरेगाव पार्क येथील भारतीय अन्नधान्य महामंडळाच्या गोदामात तर शिरूर लोकसभा मतदार संघाची मतमोजणी रांजणगाव (कोरेगाव) औद्यागिक वसाहतीतील महाराष्ट्र वखार महामंडळाच्या गोदामात होणार आहे. सर्व मतमोजणी केंद्राची प्रशासन, पोलीस विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, अग्नीशमन यंत्रणा आदी विभागांनी सुरक्षतेच्यादृष्टिने संयुक्त पाहणी केली आहे. प्रत्येक विधानसभा मतदार संघात नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना मतदान प्रक्रिया, ईव्हीएम हाताळणीबाबतचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. निवडणूकीच्या कामकाजासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध असून लोकसभा निवडणूक शांततेत व सुरळीतपणे पार पाडण्यासाठी सर्व नियोजन करण्यात आले आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.



# पांडुरंग परिवारातील प्रत्येक कार्यकर्ता भाजपचा कार्यकर्ता : प्रशांत परिचारक

पंढरपूर/प्रतिनिधी : इतर परिवारातील वेगवेगळ्या पक्षात काम करणारे कार्यकर्ते आहेत पण पांडुरंग परिवारातील एकही कार्यकर्ता भाजप सोडून इतर पक्षाचे काम करणार नाही पांडुरंग परिवर्तन प्रत्येक कार्यकर्ता भाजप कार्यकर्ता म्हणून काम करणारे असा विश्र्वास पांडुरंग परिवाराचे नेते प्रशांत परिचारक यांनी व्यक्त केली करकम येथे पांडुरंग परिवाराच्या वतीने कार्यकर्ता व पदाधिकारी यांची विचार व निम्मे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी माढा लोकसभा मतदारसंघातील जनता पार्टी व शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस रिपाई रासप व मित्र पक्ष माहितीचे उमेदवार खासदार रणजीत सिंह नाईक निंबाळकर मा.आ. प्रशांत परिचारक भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतन केदार बाजार समितीचे सभापती हरीश गायकवाड उपसभापती राजू बापू गावडे पांडुरंग कारखान्याची उपाध्यक्ष कैलास खुळे तानाजी वाघमोडे माऊली हळणवार बाळासाहेब देशमुख राहुल पुरवत ज्ञानदेव कोरके पांडुरंग व्यवहारे बाबुराव जाधव आधीच पांडुरंग परिवारातील सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते

# दक्षिण भारतात ही नरेंद्र मोदीच्या नेतृत्वाचा करिष्मा दिसेल

## केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले




कन्याकुमारी : प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी मागील दहा वर्षाच्या काळात देशाचा कारभार चांगला चालविला आहे.राष्ट्रहिताच्या जनहिताच्या योजना राबवल्या आहेत.गरिबांपर्यंत अन्न-धान्य मोफत पोहोचविले आहे.विविध योजनांचा लाभ सामन्य माणसा पर्यंत पोहोचला आहे.त्यामुळे सामान्य माणुस मोदीच्या पाठीशी उभा आहे.दक्षिण भारतातही जनतेचा प्रतिसाद वाढत आहे. त्यामुळे मुख्यमंत्री एम.के.स्टॅलीन यांनी काँग्रेस आघाडी सोबत केलेली युती पराभुत होणार आहे.

जनेतेच्या वाढत्या प्रतिसादामुळे दक्षिण भारतातही प्रधानमंत्री नरेद्र मोदीच्या नेतृत्वाचा करिष्मा दिसणार आहे.असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले.कन्याकुमारी येथे भाजप उमेदवार पौंन राधाकृष्ण यांच्या प्रचारार्थ नागरकोईल येथे आायोजित जाहिर सभेत ना.रामदास आठवले बोलत होते.भाजप राधाकृष्ण हे माजी केंद्रिय राज्यमंत्री आहेत.भाजपचे ते वरिष्ठ नेते आहेत.मोदी सरकार मध्ये त्यांनी अर्थराज्यमंत्री म्हणुन काम के ले आहे.अनुभवी नेते म्हणुन कन्याकुमारीतील जनतेने भाजप चे पौंन राधाकृष्ण यांना विजयी करण्याचे आवाहन ना.रामदास आठवले यांनी केले.यावेळी मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

कन्याकुमारी येथे अरबी समुद्र,हिंद महासागर आणि बंगालचा उपसागर अशा तीन समुद्राचा संगम होतो.त्यामुळे कन्याकुमारी तेथे तीन समुद्रच्या संगमस्थळी समुद्राजवळ महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा उभारण्यात यावा अशी रिपब्लिकन पक्षाची अनेक वर्षाची मागणी आहे.या मागणीच्या पूर्ततेसाठी पौंन राधाकृष्ण यांनी प्रयत्न करावे अशि सुचना ना.रामदास आठवले यांनी त्यावेळी दिली.

तामिळनाडुचे मुख्यमंत्री एम.के स्टॅलीन यांच्या कार्यकाळात तामिळनाडुत दलित अत्याचार वाढलेले आहेत.त्यामुळे तामिळनाडुतील दलित जनता स्टॅलिन यांच्या डी.एन.के आणि काँग्रेस आघाडीला पराभवाचे पाणी पाजेल असे ना.रामदास आठवले म्हणाले.तामिळनाडुचा विकास नरेंद्र मोदीच करु शकतात.मोदीच्याच नेतृत्वात भारत देशाचा विकास होईल असा जनेतेचा विश्र्वास असे ना.रामदास आठवले म्हणाले.आपल्या प्रचाराला वेळ काढुन आल्याबद्दल भाजपचे उमेदवार पौंन राधाकृष्ण यांनी ना.रामदास आठवले यांचे आभार मानले.रिपब्लिकन पक्षाच्या पाठिब्यामुळे आपण नक्की विजयी होऊ असा विश्र्वास पौंन राधाकृष्ण यांनी व्यक्त केला.निवडूण आल्या नंतर कन्याकुमारी आणी नागरकोईचा आपण विकास करु अशी ग्वाही पौंन राधाकृष्ण यांनी दिली.

# वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियन येथे महाराष्ट्र प्रदेश बैठक संपन्न

मुंबईः आंबेडकर भवन दादर या ठिकाणी अधिकृत बैठक वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियनच्या वतीने घेण्यात आले व राष्ट्रीय अध्यक्ष अँड प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशानुसार, सुरेशजी मोहिते स (महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस) व इंजि.प्रो राज आटकोरे (महाराष्ट्र प्रवक्ते, पश्र्चिम महाराष्ट्र निरीक्षक) यांच्या प्रमुख उपस्थित प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी दिलेले उमेदवार यांना महाराष्ट्रभर निवडून आणण्याकरिता बैठक ठेवण्यात आले होते. यावेळी कमलेश उकरंडे (वंचित बहुजन आघाडी पुणे जिल्हा अध्यक्ष) यांच्या अध्यक्ष खाली बैठक घेण्यात आले व त्या बैठकीत वंचित बहुजन आघाडीचे प्रत्येक जिल्ह्यातील उमेदवार यांचा प्रचारक म्हणून वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियन पूर्ण ताकतीने या रिंगणात मेहनत करणार आहोत, तसेच संपूर्ण जिल्ह्यातून



आलेले जिल्हा अध्यक्ष यांनी कशाप्रकारे यंत्रणा राबू प्रत्येकाने आपले व्यक्तिगत मत मांडण्यात आले व सुरेशजी मोहिते व राज आटकोरे यांनी प्रचार प्रसार कशा पद्धतीने झाला पाहिजे त्याकरिता संपूर्ण जिल्ह्यातील जिल्हा अध्यक्षांना पूर्ण माहिती देण्यात आली व कशाप्रकारे प्रचार च्या माध्यमातून लोकांपर्यंत पोचून व जास्तीत जास्त निधी ड.प्रकाश आंबेडकर साहेब यांना देऊ आणि मतदान हे वंचित बहुजन आघाडीच्या अधिकृत उमेदवारांना होईल त्याकरिता या फॉर्मुले सांगण्यात आले.

यावेळी प्रमुख उपस्थिती : सुनील भाऊ लोखंडे (मुंबई सचिव),मा.कमलेश उकरंडे (वंचित बहुजन आघाडी पुणे जिल्हा अध्यक्ष), मा.प्रदीप गौतम साळवे (नवी मुंबई, पुणे, जळगाव, जिल्हा निरीक्षक), वेदांत जाधव(रायगड जिल्हा निरीक्षक), विनोद भाऊ नरवाडे (औरंगाबाद जिल्हा निरीक्षक),राज दुरानी (पालघर जिल्हा निरीक्षक), राहुल भाऊ इंकार (पुणे जिल्हाध्यक्ष), मा.स्वामी ज्योतिर्लिंग साहेब (सोलापूर जिल्हा अध्यक्ष), मा.आकाश भाऊ जावळे (बीड जिल्हाध्यक्ष), के.के जगताप (औरंगाबाद जिल्हा अध्यक्ष), सीमाताई कांबळे (नवी मुंबई जिल्हा उपाध्यक्ष), बालाजी पठाडे (जळगाव जिल्हा अध्यक्ष), प्रकाश भाऊ पारेख (जालना जिल्हा अध्यक्ष), बाळासाहेब गायकवाड (बीड जिल्हा महासचिव) , मानिक हजारे (बीड जिल्हा उपाध्यक्ष),सिद्धार्थ बनसोडे (अक्कलकोट तालुका अध्यक्ष), ए आर पटेल (कलवा मुंब्रा शहराध्यक्ष),मा.रामा कुव्हारे (सचिव पुणे जिल्हा),मा.सदाशिव कांबळे (प्रसिद्धी प्रमुख पुणे जिल्हा) व कार्यकर्ते आणि सभासद शेकडो संख्येने उपस्थित होते.

# आशा सेविकांच्या हाती मतदान जनजागृतीची दोरी, मतदान करून उभारू, लोकशाहीची गुढी

मुंबई : मतदानाचा अधिकार हा कोणत्याही लोकशाही समाजातील मुलभूत अधिकार आहे. हा आपल्या लोकशाहीचा खरा आधारस्तंभ आहे. मतदान करणे हा केवळ अधिकारच नाही, तर ती आपली जबाबदारी आणि कर्तव्य सुद्धा आहे.

त्यामुळे सक्षम लोकशाहीसाठी 'आपल्या मताचे करा दान, ही आहे लोकशाहीची जाण' हा नारा घेऊन आशा सेविकांनी घरोघरी मतदान जनजागृती करत लोकशाहीची ही गुढी उभारण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

देशाच्या हितासाठी व विकासासाठी मतदान करणे आवश्यक आहे. मतदार हा राजा आहे. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मतदारांनी निवडणुकीत मतदानाचा पवित्र हक्क बजावला पाहिजे. यासाठी यंदाच्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेत जिल्ह्यातील सर्व नागरिकांना आपल्या मतदानाचा हा पवित्र हक्क बजावता यावा यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीपचे नोडल अधिकारी डॉ. सुभाष दळवी यांच्या समन्वयाने मुंबई उपनगर जिल्ह्यातील चारही लोकसभा मतदारसंघात आशा सेविकांमार्फत घरोघरी जाऊन मतदान करण्याबाबत जनजागृती करण्यात येत आहे.



निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर जिल्ह्यात स्वीपच्या माध्यमातून जनजागृतीचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी वाढविणे, १८ वर्षावरील नव मतदारांची नोंदणी करणे, दिव्यांग तसेच ज्येष्ठ नागरिकांना मतदानाच्या या प्रक्रियेत सहभागी करून घेणे इत्यादी कामे स्वीपच्यामार्फत हाती घेण्यात आली आहेत. यामध्ये जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या वतीने स्वीपअंतर्गत आशा सेविका तसेच मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना वेळोवेळी प्रशिक्षण देखील देण्यात येत आहे. घरोघरी जनजागृती करतांना मतदार हेल्पलाइन ीिंशीी.शलळ.सीं.ळप हे संकेतस्थळ आणि सक्षम डरज्ञीहरा-एउख पच्या माध्यमातून नव मतदारांचे अर्ज भरून घेणे, मतदार यादीत नाव तपासणे किंवा नोंदणी करणे इत्यादी बाबत मतदारांना मार्गदर्शन करण्यात येत आहे.



मुंबई : एप्रिल रोजी विश्र्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा १३३ वा जयंती सोहळा साजरा होत असताना कायदा व्यवस्था निर्माण होऊ नये. व जयंतीचा सोहळा अत्यंत चांगल्या पद्धतीने पार पडावा यासाठी महाराष्ट्र राज्य पोलीस महासंचालक माननीय रश्मी शुक्ला मैडम यांच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत जयंती बाबत येणाऱ्या प्रश्र्नांवर प्रमुख कार्यकर्त्यांनी आपापल्या सूचना दिल्या सदर कार्यकर्ते भिकाजी कांबळे भारतीय बौद्ध महासभा, नागसेन कांबळे समन्वय समिति, महेंद्र साळवे समन्वय समिति प्रतीक कांबळे विश्र्वशांती संस्था, प्रदीप कांबळे चैत्यभूमी व्यवस्थापक, सिरीज चिखलकर व भंते आधी उपस्थित होते. आपला नम्र कामगार नेते रमेश जाधव चैत्यभूमी व्यवस्थापक अध्यक्ष जनसंपर्क व प्रसिद्धी समिति बौद्धजन पंचायत समिति

# लक्ष्मीबाईनी केलेल्या त्यागातून रयत शिक्षण संस्थेचा पाया पक्का बनला : प्रा.डॉ.कदम

पंढरपूर/प्रतिनिधीः महाराष्ट्र समृद्ध करण्यात छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्याची निर्मिती केली. महात्मा फुले-राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजात समता, स्वातंत्र्य आणि बंधुभाव निर्माण केला. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाच्या माध्यमातून त्यांचा वसा आणि वारसा पुढे चालविला. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्यात त्यांच्या पत्नी रयतमाउली लक्ष्मीबाई यांचे महत्त्वाचे योगदान राहिले आहे. लक्ष्मीबाईनी केलेल्या त्यागातून रयत शिक्षण संस्थेचा पाया पक्का बनला. त्यांचा त्याग आपण ध्यानात घेऊन तो जपला पाहिजे असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य प्रा. डॉ. सदाशिव कदम यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात रयतमाउली सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या स्मृतीदिनानिमित्त समारंभ समिती, सांस्कृतिक विभाग, प्राध्यापक प्रबोधिनी व कमवा व शिका योजना समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'रयतमाउली सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील: जीवन आणि कार्य' या विषयावर व्याख्यानात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, रयत शिक्षण संस्थेच्या जनरल



बॉडीचे सदस्य प्रिं. डॉ. जे. जे. जाधव, सुभाषआबा सोनवणे, अमरजीत पाटील, डॉ. राजेंद्र जाधव, उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, उपप्राचार्य डॉ. बजरंग शितोळे, उपप्राचार्य प्रा. राजेश कवडे, कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा. युवराज आवताडे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रा. डॉ. सदाशिव कदम पुढे म्हणाले की, सुरुवातीच्या काळात सनातनी संस्कारात वाढलेल्या लक्ष्मीबाईनी आपल्या पतीच्या सामाजिक कार्याच्या तत्वाचा स्वीकार केला. वसतीगृहात आलेल्या मुलांचे संगोपन केले. त्यांचे खाणे-पिणे-राहणे याबाबी सांभाळल्या अनेक प्रसंगी आजारपणात सेवा-सुश्रूषा केली. वसतीगृहातील मुलांच्या जेवणासाठी त्यांनी स्वतःचे सर्व दागिने विकले शेवटी स्वतःचे मंगळसूत्र गहाण ठेवण्याची वेळ त्यांच्यावर आली. मात्र पवित्र अशा शैक्षणिक कार्यापासून त्या तसूभरही ढळल्या नाहीत. म्हणून कर्मवीर भाऊराव पाटील सामाजिक आणि शैक्षणिक कार्यात हिरिरीने भाग घेवू शकले. लक्ष्मीबाईंचा त्याग आपण विसरता कामा नये

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे म्हणाले की, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यावर झालेले पुरोगामी संस्कार त्यांच्या जीवनाला वळण देणारे ठरले. एखादी संस्था सुरु करताना आणि ती नावारूपास आणताना फार मोठ्या प्रमाणात त्याग आणि परिश्रम करावे लागतात. भाऊराव पाटील यांना त्यागी माणसे भेटली त्यामध्ये लक्ष्मीबाई यांचे योगदान बहुमोल आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. रमेश शिंदे यांनी केले. या कार्यक्रमास सिनिअर, ज्युनिअर, व्होकेशनल आदी विभागातील शिक्षक-शिक्षकेतर सेवक, कार्यालयीन सेवक, विद्यार्थी-विद्यार्थ्यींनी बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कुबेर गायकवाड यांनी केले. शेवटी उपस्थितांचे आभार समारंभ समितीचे चेअरमन प्रा. डॉ. दत्तात्रय डांगे यांनी मानले.

# आंतरराज्य मालवाहतूक व प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांची दोन्ही राज्यात कसून तपासणी करावी

## उत्पादन शुल्क विभागीय उपायुक्त सागर धोमकर

✼ दोन्ही राज्याच्या सीमावर्ती भागात संयुक्त मोहीम राबवून अवैध दारू विरोधी कठोर कारवाई करावी ✼ सोलापूर येथे राज्य उत्पादन शुल्क व कर्नाटक राज्य उत्पादन शुल्क विभागाची आंतरराज्य समन्वय बैठक संपन्न




सोलापूर : भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहीर केलेला असून या अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघासाठी दिनांक ७ मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. तरी या कालावधीत सोलापूर जिल्ह्यात कर्नाटक राज्यातून कोणत्याही प्रकारे अवैध दारू येणार नाही व येथून कर्नाटक राज्यात जाणार नाही यासाठी दोन्ही राज्यातील उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्यांनी परस्परांत समन्वय ठेवून आंतरराज्य मालवाहतूक व प्रवासी वाहतूक करणाऱ्या सर्व वाहनांची दोन्ही बाजूकडील चेक पोस्टवर कसून चौकशी करावी, असे निर्देश राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पुणे विभागीय कार्यालयाचे उपायुक्त सागर धनगर यांनी दिले.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने महाराष्ट्र व कर्नाटक राज्याच्या उत्पादन शुल्क विभागाची आंतरराज्य समन्वय बैठक सोलापूर नियोजन भवन येथील सभागृहात झाली यावेळी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे विभागीय उपायुक्त श्री. धोमकर मार्गदर्शन करत होते. यावेळी विजयपुरा जिल्ह्याचे उपायुक्त शिवलिंगप्पा बनाटी, अधीक्षक जगदीश इनामदार, गुलबर्गा जिल्ह्याच्या उपायुक्त आफरीन सय्यद, अधीक्षक एन.सी. पाटील, उपअधीक्षक होनप्पा ओलेकर, सलगरे, निरीक्षक भिमन्ना राठोड, बी दौलतराय, बसवराज कित्तूर तसेच सांगली जिल्ह्याचे अधीक्षक प्रदीप पोटे, सोलापूर जिल्ह्याचे उपअधीक्षक संजय पाटील, निरीक्षक नंदकुमार जाधव, जगन्नाथ पाटील, सचिन भवड, दुय्यम निरीक्षक सौरभ भोसले, समाधान शेळके, सुखदेव सिद, सुरेश झगडे, शिवकुमार कांबळे, मानसी वाघ, सचिन गुठे तर धाराशिव जिल्ह्याचे निरीक्षक पवन मुळे व राहुल बांगर हे अधिकारी उपस्थित होते.

विभागीय उपायुक्त श्री. धोमकर पुढे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर दोन्हीही राज्यात आदर्श आचारसंहितेचे तंतोतंत पालन झाले पाहिजे. या निवडणुका निर्भय व खोल्या वातावरणात होण्यासाठी महाराष्ट्र व कर्नाटक राज्य उत्पादन शुल्क विभागाने परस्परात समन्वय ठेवून अवैध दारू विक्री करणाऱ्या विरुद्ध संयुक्तपणे मोहीम उघडली पाहिजे. यासाठी दोन्ही राज्यात सीमावर्ती भागातील चेक पोस्ट द्वारे अंतरराज्य मालवाहतूक व प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांची अत्यंत सूक्ष्मपणे तपासणी करावी. तसेच अन्य वाहनांचीही कसून चौकशी करून एक ही वाहनातून अवैध दारू वाहतूक होणार नाही याची खबरदारी घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

महाराष्ट्र व कर्नाटक उत्पादन शुल्क विभागाने अवैध दारू तस्करी करणाऱ्याच्या माहितीचे संकलन करून परस्परांना द्यावी

. सीमावर्ती भागांमध्ये सामूहिक मोहिमा राबवणे, अवैध दारू साठवणूक ठिकाणे व हातभट्टी ठिकाणांची गोपनीय माहिती काढून त्यावर कारवाई करणे, सीमेवरील दारू दुकानांच्या दारु विक्री व्यवहारांवर कठोर नियंत्रण ठेवावे अशा सूचना श्री. धोमकार यांनी दिल्या.

यावेळी गुलबर्गा व विजयपुरा जिल्ह्यातील विभागीय उपायुक्तांनीही आचारसंहिता कालावधीत दोन्ही राज्यातील अधिकाऱ्यांनी परस्परांमध्ये समन्वय राखून व एकमेकांच्या संपर्कात राहून अवैध दारूची वाहतूक व विक्री होणार नाही याबाबत पुरेपूर दक्षता घेणे बाबत सर्व अधिका-यांना मार्गदर्शन केले.

सोलापूर व माढा मतदारसंघासोबतच कर्नाटक राज्यातील गुलबर्गा व विजयपुरा लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूकीकरिता ७ मे रोजी मतदान होत असल्याने त्या अनुषंगाने मतदान कालावधी संपण्याच्या ४८ तास पूर्वीपासून दारु दुकाने बंद ठेवण्याबाबत सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी ड्राय डे आदेश निर्गमित केले आहे. त्याच अनुषंगाने कर्नाटक राज्यातही ड्राय डे आदेश काढावेत अशी मागणी सोलापूर उत्पादन शुल्क अधीक्षक नितीन धार्मिक यांनी केली.

प्रारंभी बैठकीचे प्रास्ताविक श्री. धार्मिक यांनी करून लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहिता कालावधीत राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध दारूविरुद्ध केलेल्या कारवाईबाबत सादरीकरण केले.

# जळकोट येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती अध्यक्षपदी प्रदिप लोखंडे तर उपाध्यक्षपदी सागर लोखंडे

वागदरी / एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ वी जयंतीच्या अध्यक्षपदी प्रदिप लोखंडे तर उपाध्यक्षपदी सागर लोखंडे यांची सर्वानुमत्ते निवड करण्यात आली



सदरची बैठक प्रकाश लोखंडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली बैठकीच्या सुरुवातीस डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे पुजन अरुण लोखंडे आणि अकूंश लोखंडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून त्रिशरण पंचशिल घेण्यात आले व बैठक सुरुवात करूण सचीव म्हणुन प्रकाश लोखंडे सहसचीव सतीश माने सल्लागार म्हणुन अरविंद लोखंडे सुनिल माने अभिमन्यू लोखंडे तर मिरवणूक प्रमुख म्हणून परमेश्र्वर लोखंडे लक्ष्मण लोखंडे प्रविण लोखंडे मुकेश लोखंडे स्वदेश लोखंडे रोहन काबळे (चिग्या )आदीची निवड करण्यात आली सदर बैठकीस रमेश लोखंडे गजानन लोखंडे विनोद लोखंडे इंद्रजित लोखंडे अशुतोष भालेराव हरिदास लोखंडे हणमंत लोखंडे तुकाराम लोखंडे शिवाजी लोखंडेअनिल पासोडे गणेश म लोखंडे राजेद्र लोखंडे बिबिसेन लोखंडे अक्षय सुरवसे गौतम लोखंडे सुमंत लोखंडे अविनाश लोखंडे युवराज लोखंडे भानुदास लोखंडे नारायण लोखंडे विठल लोखंडे गोयल मनोहरे रोहीत माने अजय लोखंडे सह युगपुरुष तरुण मंडळाचे सर्व सदस्य्य भिमनगर मधील महिल मोठया संख्येने उपस्थित होते १४ एप्रिल ते ३० एप्रिल या कालवधीध्ये मंडळाने विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे .

# जुळे सोलापूर व हद्दवाढ भागाचा विकास करण्यासाठी कटीबद्ध : आ.प्रणिती शिंदे



सोलापूर/प्रतिनिधीः प्रभाग क्रमांक २५ हत्तुरे वस्ती, मजरेवाडी, विमानतळ परिसरामध्ये लोकसभेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने नियोजन बैठक मातोश्री सिद्धवाबाई हत्तुरे सांस्कृतिक भवनात आयोजित करण्यात आली होती.

यावेळी व्यासपीठावर सोलापूर लोकसभेच्या महाविकास आघाडी च्या उमेदवार आ.प्रणिती शिंदे, सोलापूर जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष विजयकुमार हतुरे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेश प्रवक्ते प्रा. काकासाहेब कुलकर्णी,युवा सेनेचे जिल्हाप्रमुख बालाजी चौगुले, काँग्रेसचे नितीन भोपळे, युवा सेनेचे शहर प्रमुख राम कांबळे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शरद पवार गटाचे सचिवा गौरा कोरे, ज्येष्ठ नागरिक सोनार मामा, श्री सिद्धेश्र्वर साखर कारखान्याचे कामगार युनियनचे अध्यक्ष अशोक बिराजदार, ज्येष्ठ साहित्यिक चेन्नवीर भद्रेश्र्वरमठ आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार प्रणिती शिंदे असे म्हणाले की गेल्या दहा वर्षांमध्ये भाजपाचे खासदार असल्यामुळे सोलापूर विकासापासून वीस वर्षे मागे पडला आहे. जुळे सोलापूर हद्द वाढ भागामध्ये कोणत्याही विकासाचे काम मागील दोन्ही खासदारांनी केले नाहीत. सोलापूर शहर हद्दवाढ भागाच्या विकासासाठी मी कटिबद्ध आहे.

म्हणून येणाऱ्या काळामध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार लोकसभेत पाठवा असे आवाहन आमदार प्रणिती शिंदे यांनी केले आहे.

यावेळी सोलापूर जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष विजयकुमार हत्तुरे यांनी आमदार प्रणिती शिंदे यांनी केलेल्या पंधरा वर्षातील विकास कामाचा ऊहापोह केला व काँग्रेस उमेदवाराला जुळे सोलापूर व हद्दवाढ भागातून पन्नास हजार मताधिक्याने देऊ अशी ग्वाही दिली. याप्रसंगी सुधाकर कोरे, उत्तर सोलापूर महिला काँग्रेसच्या उपाध्यक्ष पाटील, शहर महिला काँग्रेसच्या सचिवा वर्षा अतनुरे, सुनिता राजपूत, युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष धीरज खंदारे, शंकर नगर येथील महिला बचत गटाचे प्रमुख गीता वारे,क्रांतीसुर्य संघटनेचे अध्यक्ष महेश आठवले,पीजी ग्रुपचे लक्ष्मण किणीकर, शैलेश शेवगार, नागेश हत्तुरे,पप्पू पाटील, राज हत्तुरे कोरे वस्तीचे मालक लहू कोरे, इनामदार चाचा,सलीम शेख,रुद्रप्पा कांबळे,बाळू सावंत,अप्पू बिराजदार,ओंकार हत्तुरे, सिद्धार्थ हत्तुरे,संदेश हत्तुरे, रिक्षा संघटनेचे किरण राठोड,राम जाधव,नागेश धुम्मा, गंगाधर कांबळे आदी सह या परिसरातील नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय बनसोडे सर तर आभार प्रदर्शन नागेश पडनुरे यांनी केले.

# डॉ बाबासाहेब आंबेडकरांची जयंती समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम घेऊन साजरी करावी

## नळदुर्ग येथे भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हा बैठकीत झाला निर्णय



नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : डॉ बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाचे शिल्पकार आसुन प्रत्येक गावात समाज एकत्र करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची जयंती साजरी करावी बौद्ध संस्कारांचे महत्त्व सांगत मात्र संस्था दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया अर्थात भारतीय बौद्ध महासभा या मात्र संस्थेचे बॅनर लावुन प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत या विचारांची देवाणघेवाण प्रत्येक मानवाच्या कल्याणासाठी आसेल प्रत्येकाने बाबासाहेब वाचला पाहिजे जे वाचेल तोच वाचेल आसे परखड मत भारतीय बौद्ध महासभेच्या दक्षिण विभाग जिल्हाध्यक्षा विजयमालाताई धावारे यांनी केले. नळदुर्ग येथे उद्योगपती चंद्रकांत डावरे यांच्या स्वगृही दक्षिण जिल्हा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते त्या वेळेस अध्यक्षीय समारोप करताना बोलत होत्या

प्रथमता तथागत भगवान गौतम बुद्ध आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले त्रिशरण पंचशिल घेऊन बैठकीला सुरवात करण्यात आली.

तर प्रमुख उपस्थिती केंद्रीय शिक्षक माजी श्रामणेर तथा बौध्दाचार्य गुणवंत सोनवणे , जिल्हा कोषाध्यक्षा राजश्रीताई कदम , जिल्हा पर्यटन विभागाचे उपाध्यक्ष विश्र्वास भाऊ पांडागळे , जिल्हा संघटक विजय बनसोडे जिल्हा कार्यालयीन सचिव दादासाहेब बनसोडे जिल्हा महिला उपाध्यक्षा शिलाताई चंदनशिवे केंद्रीय शिक्षीका मिनाताई लगाडे उमरगा तालुका अध्यक्ष संतोष सुरवसे तुळजापूर तालुका अध्यक्ष रामेश्र्वर चंदनशिवे तालुका सरचिटणीस उमेश गायकवाड अविनाश भालेराव , किरण कांबळे , उद्धव गायकवाड , विद्याताई कांबळे , झुंबर गायकवाड , संगीता गायकवाड सिमा लोंढे , संगीता भोसले , इंदुबाई भालेराव बलभीम गायकवाड आदिजनांच्या उपस्थितीत ही दक्षिण जिल्हा बैठक संपन्न झाली यामध्ये समता सैनिक दल बौद्ध धम्म परिषद मागील अहवाल वाचन करून पुढील कार्यवाही साठी सुरवात करण्यात आली